R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ५१

दि.०३ फेब्रुवारी २०२६,वार: मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## बुध्दाची शिकवण जगाला मानवतेचा संदेश आहे - भिक्खु पय्यानंद थेरो

तथागत बुद्धांचे व्यक्तिमत्व म्हणजे जगातील सर्वोत्तम ज्ञानी अद्वितीय, अतुलनीय असे व्यक्तिमत्व होय. बुद्ध शिकवण ही सर्व प्राणी मात्रा साठी कल्याण दायी आहे. बुध्दाची करुणा मैत्री शांती बंधूभाव आणि समता ही मानव हिताची आहे. यामुळे बुध्दाची शिकवण संपूर्ण जगाला मानवेतेचा संदेश असल्याचे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे.



महाविहार सातकर्णी नगर, लातूर येथे माघ पौर्णिमेनिमित्त धम्मदेशना व सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी कार्यक्रमाची सुरुवात तथागत बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पुष्पाने धुपाने दीपाने भिक्खु संघ आणि मान्यवरांच्या हस्ते पूजा करून त्रिशरण पंचशील सामूहिक बुध्द वंदना करण्यात आली.पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की तथागत बुद्धांचे व्यक्तिमत्त्व हे जगातील सर्वोत्तम, अद्वितीय व अतुलनीय अशा ज्ञानी पुरुषाचे प्रतीक आहे. बुद्धांची शिकवण केवळ एका समाजापुरती मर्यादित नसून, ती सर्व प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी आहे.करुणा, मैत्री, शांती, बंधुभाव आणि समता ही बुद्धधम्माची मूलतत्त्वे असून, ती संपूर्ण मानवजातीच्या हिताची आहेत. द्वेषाऐवजी करुणा, हिंसेऐवजी अहिंसा आणि भेदभावाऐवजी समता यांचा मार्ग दाखवणारी बुद्धांची शिकवण आजच्या अस्वस्थ जगाला योग्य दिशा देते. म्हणूनच तथागत बुद्धांचा संदेश हा केवळ धार्मिक न राहता, संपूर्ण मानवतेसाठीचा शाश्वत जीवनमार्ग असल्याचे भिक्खु पय्यानंद थेरो यांनी विषद केले.या प्रसंगी लातूर शहर महानगरपालिकेमध्ये नव्यानेच निवडून गेलेले बौद्ध समाजाचे नवनिर्वाचित सदस्यांचा सन्मान समारंभ करण्यात आला यात प्रामुख्याने ड. अतिश चिकटे, इंजि. सचिन गायकवाड, विनय जाकते,ड. मनोज थोरात,निकिता सोमवंशी, अंकिता भाडिकर, जयश्री सोनकांबळे, करुणा शिंदे,कांचन आजनिकर यांचा मान्यवरांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.या प्रसंगी सहकार लेखाधिकारी राहुल बागडे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.या वेळी भंते बोधिराज यांचे ही धम्म प्रवचन झाले.या समयी माणिक शाक्यमुनी, नामदेव साने या परिवाराच्यावतीने भोजनदान देण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, सतीश मस्के, करण ओव्हाळ, राजेश कदम, मिलिंद धावारे ई. परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक केशव कांबळे यांनी केले तर आभार पांडुरंग अंबुलगेकर यांनी मानले.

या निमित्ताने जि. एस. साबळे, प्रा. यु. डी. गायकवाड, प्रा. प्रवीण कांबळे, प्रेम गायकवाड, उत्तम कांबळे, प्रकाश सुरवसे,उमेश कांबळे, ड. रोहित सोमवंशी, सूर्यभान लातूरकर,धम्मपाल साकळे, विलास अवशंक,राजू गवळी, ज्योतीराम लामतुरे, राहुल शाक्यमुनी,वसंत वाघमारे,भालचंद्र सोनकांबळे,आकाश सरवदे, पंडित सूर्यवंशी,डॉ. अरुण कांबळे,दिलीप हरणे, ज्ञानेश्वर सुरवसे,गणपत कदम,शिला वाघमारे, मयुरी आल्टे, मीना कदम, प्रणिता वाघमारे, ललिता सवई, सुनिता सावंत,स्वाती सूर्यवंशी, सरिता बनसोडे,शोभा महालिंगे,अस्मिता शाक्यमुनी ई. सह समाजातील प्रतिष्ठित मान्यवरांसह बौद्ध उपासक उपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कॉन्शिअस सेडेशन बाल दंत उपचारातील सुरक्षित व प्रभावी पद्धत डॉ. विश्वास पाटील; एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात बाल दंत उपचार विषयावर कार्यशाळा

लातूर- बाल दंत रोग उपचारांमध्ये मुलांची भीती, चिंता व वेदना कमी करून सुरक्षित आणि प्रभावी उपचार करण्यासाठी 'कॉन्शिअस सेडेशन' ही आधुनिक उपचार पद्धत अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. या पद्धतीमुळे मुलांमध्ये दंत उपचाराची भीती दूर होऊन उपचार प्रक्रिया अधिक सुलभ, सकारात्मक व रुग्णस्नेही बनते, असे प्रतिपादन पुणे येथील बाल दंत रोग तज्ज्ञ डॉ. विश्वास पाटील यांनी केले.



येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या बाल दंत रोग विभागातर्फे 'बियोंड फिअर कॉन्शिअस सेडेशन इन प्रॅक्टिस' या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ विश्वास पाटील बोलत होते. या वेळी महाराष्ट्र राज्य दंत परिषदेचे निरीक्षक डॉ. मुकेश अर्दाळे, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. महेश दडपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. विश्वास पाटील म्हणाले की, कॉन्शिअस सेडेशन ही दंत उपचारांदरम्यान वापरली जाणारी सुरक्षित, वेदनाशामक व चिंता कमी करणारी पद्धत असून या प्रक्रियेत बाल रुग्ण पूर्णपणे शुद्धीत असतो. मात्र उपचारादरम्यान भीती, तणाव व वेदना लक्षणीयरीत्या कमी होतात. ही पद्धत जनरल ॲनेस्थेशियापेक्षा अधिक सुरक्षित मानली जाते.

'बियोंड फिअर' म्हणजे भीतीपलीकडे जाऊन उपचार करणे होय. बाल रुग्णांमध्ये सुई, दंत उपकरणांचा आवाज तसेच पूर्वीचे त्रासदायक अनुभव यांमुळे दंत उपचार करणे कठीण होते. मात्र कॉन्शिअस सेडेशनमुळे ही भीती कमी होऊन दंत चिकित्सक व रुग्ण यांच्यात सकारात्मक सहकार्य निर्माण होते. ३ ते १४ वयोगटातील मुले, अत्यंत भीतीग्रस्त किंवा सहकार्य न करणारी मुले, दीर्घ व वेदनादायक उपचार आवश्यक असलेले रुग्ण तसेच विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी ही पद्धत विशेष प्रभावी ठरते, असे त्यांनी सांगितले.

या उपचारांमध्ये नायट्रस ऑक्साइडऑक्सिजन इनहेलेशन सेडेशन ही सर्वाधिक वापरली जाणारी पद्धत आहे. मास्कद्वारे नायट्रस ऑक्साइड व ऑक्सिजन दिल्यानंतर काही मिनिटांतच रुग्ण शांत होतो, चिंता व वेदना कमी होतात आणि आनंदी भावना निर्माण होतात. ही पद्धत सुईविरहित, सुरक्षित, जलद परिणाम देणारी असून उपचारानंतर रुग्ण लगेच घरी जाऊ शकतो.

कॉन्शिअस सेडेशन करताना रुग्णाची सविस्तर वैद्यकीय माहिती, योग्य रुग्ण निवड, प्रशिक्षित दंत चिकित्सक व कर्मचारी, ऑक्सिजन सॅच्युरेशन व हृदय गतीचे सतत निरीक्षण तसेच आपत्कालीन औषधे व उपकरणांची उपलब्धता आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट करुन तज्ज्ञांच्या देखरेखीखाली उपचार केल्यास ही पद्धत अत्यंत सुरक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पद्धतीमुळे बाल रुग्णांना दंत उपचारांचा सकारात्मक अनुभव मिळतो, एकाच भेटीत अधिक उपचार शक्य होतात तसेच पालकांचा तणावही कमी होतो. परिणामी भविष्यातील दंत उपचारांसाठी मुलांचे सहकार्य वाढते, असेही डॉ. पाटील यांनी सांगितले.

यावेळी डॉ. सुरेश कांगणे यांनी दंत शिक्षणातील वैद्यकीय कौशल्य वृद्धीसाठी अशा कार्यशाळा होणे गरजेचे असल्याचे सांगीतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महेश दडपे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. श्रद्धा कस्तुरे यांनी केले तर आभार डॉ. प्रियंका मुंडे यांनी मानले.

या कार्यशाळेस डॉ. प्रसन्न डहाके, डॉ. प्रियंका मुंडे, डॉ. निलोफर शेख, डॉ. प्राजक्ता गायकवाड, डॉ. स्पूर्ती जोशी यांच्यासह बाल दंत रोग विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

## जनतेची सेवा हेच काँग्रेसचे धोरण, तर भ्रष्टाचार ही भाजपची नीती धिरज देशमुख

लातूर (बोरी) ।प्रतिनिधी□काँग्रेस पक्षाला जनसेवेचा मोठा आणि गौरवशाली वारसा असून देशाच्या सर्वांगीण विकासात काँग्रेसचे योगदान बहुमोल आहे, असे प्रतिपादन माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी केले.लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बोरी येथे आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी भातांगळी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार सुनील नामदेव पडीले, बोरी पंचायत समितीच्या उमेदवार सौ. शोभा चंद्रकांत बरचे तसेच भातांगळी पंचायत समितीचे उमेदवार उमेश अमृतराव बेद्रे उपस्थित होते.धिरज देशमुख पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक ही गावांच्या विकासाची निवडणूक आहे. मात्र भाजपचे नेते द्वेषाचे आणि जनतेची दिशाभूल करणारे राजकारण करत आहेत. भाजपच्या सत्ताकाळात भ्रष्टाचार प्रचंड वाढला असून ग्रामीण भागातील विविध शासकीय योजनांमध्ये शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर पैसे उकळले जात आहेत. त्यामुळे भाजपविरोधात मतदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. काँग्रेसची सत्ता जिल्हा परिषद व पंचायत समितीत आल्यानंतर भ्रष्टाचार संपवून सर्व शासकीय योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. काँग्रेसचे उमेदवार हे जनतेचे प्रश्न सोडवणारे, सक्षम आणि विकासाभिमुख असल्याने त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी मतदारांना केले.सभेस मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने श्री स्वामी समर्थ वृद्ध आश्रम येथे अन्नदान करून मूकनायक दिन साजरा

केज/प्रतिनिधी.-केज शहरापासून जवळच असलेले बोबडेवाडी रोडवरील स्वामी समर्थ वृद्धाश्रम येथे मूकनायक दिनानिमित्त वृद्धांसाठी मदतीचा हात म्हणून वृद्धांची सेवा करता येईल व त्यांना आधार देण्यासाठी मूकनायक दिनानिमित्त स्नेह भोजनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वृद्धांच्या जीवनात आनंद आनंद हा व्दियगुणित होव्हा, वृद्धाविषयी नागरिकांच्या मनात आपुलकीची भावना व्यक्त व्हावा या संकल्पनेतून स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.





या कार्यक्रमास वृद्धाश्रमाचे संस्थापक श्री.महादेव (बापू)कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, कलाकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मूकनायक दिनानिमित्त केज येथील कला क्रीडा विश्व समितीच्या कलाकारांनी गीत-संगीताचा सुंदर कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वृद्धांना गाण्यांची महफिल बहाल करण्यात आली. वृद्धांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान व आनंद पाहून उपस्थितांचे मने भरून आली.

या कला क्रीडा विश्व समितीच्या सर्व कलावंतांच्या पुढाकारातून वृद्धाश्रमासाठी अन्नदान करण्यात आले, ज्यामुळे कार्यक्रमाला सामाजिक सेवेची खरी उंची लाभली.

यावेळी अनिल वैरागे, मुनीर कुरेशी, बलभीम मस्के, ज्ञानेश्वर नागरगोजे, महेश जाधव, श्रीनिवास नवगिरे, अमोल सरवदे, धनराज भालेराव, सागर वाघमारे, ड. अनिता मुंडे, सुनिता बोधने, दिक्षा कांबळे, विमल अंकुशे, सुनिता नागरगोजे, छबु अंधारे, सिंधु मुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मूकनायक दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच नुकतेच निधन झालेले राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांना उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी पांडुरंग कसबे, पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष दिनकर जाधव, जयपाल रोकडे,चंद्रपाल मस्के उपस्थित होते. याच वेळी वृद्धाश्रमाचे संस्थापक महादेव (बापु) कराड यांचा सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

आलेल्या सर्व मान्यवरांसाठी तसेच वृद्धांसाठी कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

या स्तुत्य उपक्रमामुळे स्वामी समर्थ वृद्धाश्रमाच्या कार्याला तालुक्यातून मोठी दाद मिळाली असून, समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी असे उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# ३ कोटी ६२ लाख रुपयांचा घरकुल घोटाळा हा आमचा नसून तत्कालीन प्रशासनातील प्रशासक, अधिकारी व त्यावेळीच्या संबंधित लोकांचा आहे-हारुणभाई इनामदार

केज/प्रतिनिधी-३ कोटी ६२ लाख रुपयांचा घरकुल घोटाळा हा आमच्या कार्यकाळातील नसून तत्कालीन प्रशासनातील प्रशासक, अधिकारी व त्यावेळीच्या संबंधित लोकांनी केलेला आहे. अशी माहिती हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली आहे. तर घरकुल अपहार प्रकरणातील संबंधित दोषीवर शासनाने योग्य ती कारवाई करावी अशी मागणी पत्रकार परिषद द्वारे शासनाकडे हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की. दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी केज येथील शासकीय विश्राम गृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत हारुणभाई इनामदार यांनी सांगितले की, दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात एक बातमी प्रकाशित झाली ती म्हणजे केज नगरपंचायत च्या घरकुलाच्या अपहरा बाबतची एक बातमी प्रकाशित झालेली आहे. परंतु त्या बातमीमध्ये सन २०१९ ते २०२३ असा कालावधीचा थोडा आवमेळ दिसून आलेला आहे. परंतु आमच्या कार्यकाळास दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ रोजी पासून सुरुवात झालेली आहे. सदरील घरकुलांचा अपहार हा दिनांक २० मे २०१९ ते दिनांक २१ फेब्रुवारी २०२२ च्या अगोदरच झालेला आहे.त्यामुळे सदर झालेल्या घरकुल अपराचा आमचा काडीमात्र संबंध नाही असे ठाम पणे गटनेते हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी बोलताना स्पष्ट केले.

तर केज नगरपंचायतला सन २०१९ ला डीपीआर क्र.१,३७४ घरकुलाचा डीपीआर मंजूर झाला. आणि तो डीपीआर मंजूर झाल्यानंतर केंद्र शासनाकडून ४ कोटी १९ लाख ३५ हजार ४१३ रुपये तर महाराष्ट्र शासनाकडून १७ लाख १५ हजार ७०४ रुपये एवढा निधी केज नगरपंचायत ला प्राप्त झाला. हा कालावधी सन २०१९ ला सदरचा निधी हा प्राप्त झालेला होता. आज रोजी घेण्यात आलेली पत्रकार परिषदे ही कोणत्या राजकीय हेतूने प्रेरित होऊन घेण्यात आलेली नाही.

फक्त आम्ही जे लोकांना डिक्लेअर केलेले आमचे उद्दिष्ट आहे व आम्ही लोकांना दिलेला विश्वास आहे तो विश्वास आम्हाला टिकवायचा आहे. आमच्या भोळ्या-भाबड्या जनतेला केज नगरपंचायतने घरकुलाचा घोटाळा केला आहे. आशयाच्या बातम्या प्रकाशित झाल्या व तशा बातम्या लागलेल्या आहेत आणि अशा बातम्या येणे गरजेचे आहे. जे काही चुकीचे आहे ते लोकांच्या समोर येणे गरजेचे आहे व ते लोकांना माहीत झाले पाहिजे. जे काही चुकीचे असेल ते लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे, लोकांना प्रश्न कळणे गरजेचे आहे. केजच्या ज्या लोकांनी आम्हाला मोठ्या विश्वासाने केज नगरपंचायत च्या ठिकाणी सेवक म्हणून बसवले आहे. आमच्या कार्यकाळामध्ये एक रुपयाचा भ्रष्टाचार हा सिद्ध झाला तर आम्ही त्या बदल्यात आमचा भ्रष्टाचार सिद्ध करणाऱ्याला व्यक्तीला १ लाख १ हजार रुपयाचे बक्षीस जाहीर केलेले आहे. त्यामुळे आमच्या प्रतिमेला कुठेही गालबोट लागू नये आणि लोकांचा समज-गैरसमज होऊ नये म्हणून लोकांसमोर खरे व सत्य परिस्थिती मांडण्यासाठी आम्ही आज रोजीची पत्रकार परिषद घेतली आहे.

सन २०१९ च्या डीपीआर नुसार ३७४ घरकुल मंजूर झालेली आहेत व निधी देखील प्राप्त झाला होता.परंतु त्यापैकी १३३ लाभार्थ्यांना पहिला, दुसरा, तिसरा हप्ता देण्यात आला. लाभार्थ्यांना वरील रक्कम ही इतर रकमेतून त्यांच्या घरकुलांचे हप्ते हे आमच्या कार्यकाळात देण्यात आले.



केज वासियांनी आम्हाला सेवक म्हणून केजच्या नागरिकांची सेवा करण्यासाठी संधी दिली आहे व आमच्यावर नागरिकांनी मोठा असा विश्वास ठेवला आहे. त्या विश्वासाला आम्ही कुठेही तडा जाऊ देणार नाहीत. आम्ही सतत जनसेवक म्हणून मागील चार वर्षापासून काम करत आलो आहोत. यापुढेही जनतेचे जनसेवक म्हणूनच काम करत राहू. सदरचा अपहार हा आमच्या कार्यकाळात झालेला नाही आमच्या कार्यकाळाच्या अगोदर पंधरा दिवसांपूर्वी झालेला आहे.त्याचा व आमचा कुठेही काही संबंध नाही. सदर प्रकरणाचे आम्ही समर्थन करणार नाहीत व आतापर्यंत करत आलेलो नाहीत. या अपहारामुळे काही घरकुल लाभार्थ्यांचे पैसे शासनाने थांबवले आहेत. आम्ही शासन स्तरावर तात्काळ पाठपुरावा करून निधी उपलब्ध करण्यासाठी तत्पर आहोत.केज शहराच्या विकासासाठी आम्ही कायम तत्पर आहोत. आम्ही जनतेच्या व आमच्या वरिष्ठांच्या विश्वासाला कुठेही तडा जाऊ देणार नाहीत.ज्या घरकुल लाभार्थ्यांना व नागरिकांना काही अडचण आल्यास त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा. नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व गटनेते हारुणभाई इनामदार

परंतु त्यामध्ये तत्कालीन प्रशासनातील काम करणारे प्रशासक व त्या कालावधीतील कार्यरत असलेले अधिकारी आणि त्याचबरोबर संबंधित लोकांनी संगणमत करून घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे न टाकता जवळपास ३ कोटी ६२ लाख रुपये एवढा निधी हा नियमबाह्य पद्धतीने चुकीच्या मार्गाने लाभार्थ्यांच्या खात्यावर न टाकता, विविध एजन्सीच्या व ज्या ज्या एजन्सी त्यांच्या संबंधित आहेत अशा एजन्सी सामील होत्या या सर्व एजन्सीच्या नावाने डायरेक्ट धनादेश देऊन अनियमित व कायद्यात बसत नसताना ते नियमबाह्य असताना देखील अशा पद्धतीचे काम त्यावेळीचे प्रशासनात काम करणारे तत्कालीन प्रशासक व त्यावेळी चे अधिकारी आणि त्यावेळीचे संबंधित लोकांनी संगणमत करून ३ कोटी ६२ लाख रुपयाचा निधी हा लाभार्थ्यांच्या नावे खात्यावर जमा न करता व त्यांना सदरची रक्कम न देताच संबंधित एजन्सीच्या नावाने धनादेश काढून ३ कोटी ६२ लाख रुपयांचा अपहार केलेला आहे.

सदर घरकुलाचा अपहाराचा कालावधी हा शासनाच्या अहवालात म्हणजेच मुख्य अधिकारी, लेखापाल श्री. महारुद्र वडकर यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. जो कालावधी दिनांक २० मे २०१९ ते दिनांक ३१ जानेवारी २०२२ पर्यंत प्राथमिक दृष्ट्या घरकुल लाभार्थ्यांना लाभ न देताच इतरत्र कामासाठी सदरचा निधी हा आदा केल्याचे दिसून येत आहे असे शासनाच्या चौकशी अहवालात नमूद करण्यात आले आहे.

त्यासंबंधी सर्व पुरावे हे सदर अहवालात जोडलेले आहेत तसेच सदर अहवालामध्ये ज्या लाभार्थी यांना पैसे दिले आहेत अशा लाभार्थ्यांची नावे आहेत त्याचबरोबर ज्या एजन्सी व इतरांना पैसे दिलेले आहेत अशा सर्वांची नावे सदर अहवालात नमूद करण्यात आलेली आहेत.

तसेच ज्या ज्या एजन्सीच्या नावाने पैसे दिले गेलेले आहेत अशांची देखील नावे आहेत, ज्या बँकेच्या खात्यावरून सदरचे व्यवहार करण्यात आलेले आहेत त्यांचे देखील बँक स्टेटमेंट जोडून शासनाकडे अहवाल तसा सादर केलेला आहे. सदरचा अहवाल हा आम्ही माननीय जिल्हाधिकारी साहेबांकडे पाठवला आहे. शासनाकडे आमची मागणी आहे की, ज्या ज्या लोकांनी घरकुलाच्या संबंधाने अपहर केला आहे त्याचबरोबर जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. संबंधित दोषींना पावबंद बसला पाहिजे, घरकुलच्या लाभार्थ्यांसाठी आलेल्या निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी संबंधित दोषीवर योग्य ती कारवाई झाली पाहिजे. सदरचा प्रकार हा लोकांच्या समोर आला पाहिजे व लोकांना न्याय मिळाला पाहिजे. ही आमची भूमिका असून तशी आमची मागणी आहे. आम्ही सन २०२२ ची केज नगरपंचायत ची निवडणूक ही लढविली व दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ रोजी केज नगरपंचायत चा चार्ज आम्ही घेतला, सदरचा चार्ज घेण्याअगोदर पंधरा दिवसांपूर्वी सदर घरकुलाचा अपहार झालेला आहे. आम्ही चार्ज घेते वेळी चार्ज पट्टी चेक करून घेतली असता त्यावेळी नगरपंचायत च्या खात्यावर फक्त ५० हजार रुपये एवढी रक्कम शिल्लक होती.

त्या ५० हजार रुपये रकमेवर आज रोजी ४ वर्षाचा नगरपंचायतचा कारभार हा एक सक्षम, सुशिक्षित महिला नगराध्यक्षांच्या नेतृत्वाखाली सर्व पक्षांच्या नगरसेवकांना सोबत घेऊन जनतेची सेवा करत आहोत. आमच्या भोळ्या-भाबड्या नागरिकांनी खोट्या-नाट्य माहितीला बळी पडू नये, आमच्या गोरगरीब जनतेची कोणीही दिशाभूल करू नये, जनतेने आम्हाला सेवक म्हणून केज नगरपंचायत ला काम करण्याची संधी दिली आहे. आम्ही जनतेचे सेवक म्हणून काम करू, लोकांच्या विश्वासाला कदापी तडा जावू देणार नाहीत आम्ही आजपर्यंतच्या कामात कुठेही भ्रष्टाचार केलेला नाही व यापुढेही भ्रष्टाचार करणार नाहीत. मात्र संबंधित दोषीवर शासनाने योग्य ती कारवाई करावी अशी मागणी गटनेते हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून शासनाकडे केली आहे. व घरकुला झालेल्या अपराचा खुलासा त्यांनी केला आहे.

# मयत विक्की चंदनशिव सख्या चुलत भावाने केला भावाचा खून ! एक तासात आरोपीच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या

## एक तासात आरोपी ताब्यात घेतल्याने पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांची कौतुकास्पद कामगिरी

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील हनुमंत पिंपरी शिवारात चुलत भावाने चुलत भावाचा खून केल्याची खळबळजनक घटना घडली आहे.



केज तालुक्यातील हनुमंत पिंपरी येथील विक्की उर्फ आण्णा रावसाहेब चंदनशिव वय (२५ वर्ष) या युवकाचा त्याचा सख्खा चुलत भाऊ महेश उत्तरेश्वर चंदनशिव याने धारदार हत्याराने गळा चिरून त्याचा खून केला आहे.

दि. ३० जानेवारी रोजी महेश त्रिंबक चंदनशिव याने त्याचा सख्खा चुलत भाऊ विक्की उर्फ आण्णा रावसाहेब चंदनशिव याला सोबत घेऊन हनुमंत पिंपरी येथील पारधी वस्तीवर दारू पाजली. त्या नंतर त्याला जेवण्याच्या निमित्ताने मोटार सायकल वरून केवड येथील धाब्यावर घेऊन गेला. तिथेही त्याला भरपूर दारू पाजली. त्या नंतर त्याला मोटार सायकलवर बसवून घेऊन केवड आणि हनुमंत पिंपरी येथील शिवरस्त्यावर घेऊन आला. तिथे कोणी नसल्याने त्या निर्जनस्थळी घेऊन गेला. तिथे महेशने दारूच्या नशेत असलेल्या विक्की उर्फ आण्णा याला गाडीवरून उतरवून मारहाण केली आणि भाजी कापण्याच्या बतई सारख्या धारदार शस्त्राने त्याच्या गळ्यावर वार करून त्याचा खून केला. गळ्यावर वर्मी जखम झाली असल्याने अतिरक्तस्राव झाल्याने विक्की उर्फ आण्णा चंदनशिव याचा जागीच मृत्यू झालाअसावा. तो दारूच्या नशेत असल्याने त्याला प्रतिकार करता आला नसावा. असा प्राथमिक अंदाज आहे.

त्या नंतर विक्की उर्फ आण्णा चंदशिव याचे प्रेत रस्त्यावर टाकून महेश घरी निघून गेला. त्या नंतर दुसऱ्या दिवशी एका शेतकऱ्याने विकीचे प्रेत पहिल्या नंतर त्याने पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी गुप्त पद्धतीने मारेकऱ्यांची माहिती काढली आणि अवघ्या एक तासात विक्की उर्फ आण्णा चंदनशिव यांचा मारेकरी त्याचा सख्खा चुलत भाऊ महेश त्रिंबक चंदनशिव याला ताब्यात घेतले.

वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची घटनास्थळी भेट :- विक्की उर्फ अण्णा चंदनशिव याचा खून झालेल्या घटनास्थळी अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटेशराम, पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश क्षीरसागर, पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम, पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने, पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, पोलिस उपनिरीक्षक अशोक सोनवणे यांनी भेट दिली. तसेच सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब बांगर, बाळासाहेब अहंकारे, शिवाजी कागदे, आणि उपविभागीय पोलिस अधिकारी यांचे पथकाने भेट दिली.

_विक्की मंगळवारी आला होता मुंबईहून गावी :- विक्की हा चेंबूर, मुंबई येथून हनुमंत पिंपरी येथे त्याच्या आईकडे आला होता. दि. ३० जानेवारी रोजी त्याने त्याच्या आईला स्वयंपाक करून ठेव मी जेवायला येतो असे सांगून बाहेर गेला होता. म्हणून त्याची रात्रभर तो घरी कधी येईल म्हणून त्याची आई वाट पहात बसली. परंतु तो जेवायला घरी आलाच नाही.

_अशी मिळाली माहिती :- विक्की उर्फ अण्णा चंदशिव याची आई छाया रावसाहेब चंदनशिव हिने दि. ३१ जानेवारी रोजी विक्की उर्फ आण्णा चंदनशिव याची गावात चौकशी केली असता त्याला महेश चंदनशिव याने त्याच्या मोटार सायकलवर बसवून घेऊन गेल्याची माहिती मिळाली. तिने हि माहिती पोलिसांना दिली आणि तीच खरा तपासाचा मुख्य मुद्दा ठरला.

असा रचला कट :- विक्की आणि त्यांचे चुलते व चुलतभाऊ यांचे चेंबूर, मुंबई येथील घरावरून त्यांच्या कुटुंबात वाद सुरू आहे. विक्की उर्फ आण्णा आणि त्याचे चुलते बाळासाहेब प्रल्हाद चंदशिव, उत्तरेश्वर प्रल्हाद चंदनशिव, बबन प्रल्हाद चंदशिव आणि नागुराव प्रल्हाद चंदनशिव यांच्यात वाद सुरू आहे. त्याच वादातून महेश उत्तरेश्वर चंदननशिव याने विक्की उर्फ आण्णा चंदनशिव या सख्या चुलत भावाचा खून केला.



_असा लागला खुनाचा तपास :- महेश चंदनशिव याने विक्की उर्फ आण्णा चंदनशिव या त्याच्या सख्ख्या चुलत भावाचा खून केल्या नंतर त्याला वाटले आपला कुणाला संशय येणार नाही. त्याच्या मोटार सायकलवर रक्ताचे डाग असावेत म्हणून त्याने मोटार सायकल स्वच्छ धुतली होती. परंतु सकाळी खुनाची घटना उघडकीस आल्या नंतर पोलिसांनी त्याला मोटार सायकलीसह त्याला बोलावून चौकशी केली. त्यावेळी त्याच्या मोटार सायकल पुसण्याचा कपडा ओला असल्याचे आढळू आले. तिथेच पोलिसांचा संशय खरा ठरला. मयत विक्कीचा चुलता फरार :- मयत विक्की याचा एक चुलता ३० जानेवारी रोजी हनुमंत पिंपरी येथे गावात होता. परंतु त्याला विकीच्या उर्फ आण्णा चंदनशिव याच्या खुनाची माहिती मिळाल्या नंतर तो सुद्धा निघून गेला आहे. बाळासाहेब चंदनशिव याची पत्नी मुंबई येथे शिक्षिका आहे.

_गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू :- पोलिसांनी प्रेत उत्तरीय तपासणी व शव विच्छेदनासाठी प्राथमिक आरोग्यकेंद्र चिंचोली माळी येथे हलविले असून मयताची आई छाया रावसाहेब चंदनशिव यांच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सोबत:-मयत विक्की चंदनशिव यांचा पिवळा टी-शर्ट असलेला फोटो आहे व दुसरा फोटो हा आरोपीचा आहे

# जैन कलार प्रीमीयर लीग टुर्नामेंट-२०२६ थाटात संपन्न.



नागपूर. –समाजातील संपूर्ण युवा वर्ग एकत्रित यावा व नव्याने उर्जा निर्माण व्हावी या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समाजातर्फे प्रीमियर लीग सिझन -८ टुर्नामेंटचे आयोजन ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय,क्रीडा चौक,हनुमान नगर,नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते.हे टुर्नामेंट सलग दिनांक २९ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ पर्यंत चालले.यात विदर्भातील अनेक जिल्ह्यांतील संघानी भाग घेवून समाजाप्रती व खेळाप्रती जागृकता निर्माण करून एक चांगले वातावरण निर्माण केले व याचा भरपूर आनंद संपूर्ण समाजबांधवांनी मोठ्या उत्साहाने घेतला.या अनुषंगाने दिनांक १ फेब्रुवारी २०२६ ला अंतिम सामना घेण्यात आली.यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.त्याचप्रमाणे यावेळी संघ प्रमुख,आयोजक,खेळाडूंसह अनेक मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या टुर्नामेंटचा अंतिम सामना डिकेडी लॉयन्स विरुद्ध श्रीनिका शैशा किंग्ज यांच्यात झाला व यामध्ये डिकेडी लॉयन्स संघ विजयी झाला. याप्रसंगी विजेत्या संघाला प्रथम क्रमांकाचे बक्षीस ४१००० रूपये रोख रक्कम देण्यात आले व उपविजेत्या संघाला २१००० रूपये रोख रक्कम देण्यात आले व मॅन ऑफ द मॅचचे पारितोषिक रेसिंग सायकल ही लांजेवार सायकल स्टोअर्स यांच्याकडून देण्यात आली. त्याचप्रमाणे बेस्ट बॉलर, बेस्ट कॅचेस,बेस्ट विकेट घेणाऱ्या खेळाडूंचा सुध्दा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे विजेत्या व उपविजेत्या संघातील संपूर्ण खेळाडूंना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. विजेत्या संघाचे संघ प्रमुख पंकज खानोरकर, पंकज दहीकर, मयूरेश दडवे यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन युथ फाउंडेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे सुत्र संचालन राकेश मासुरकर यांनी केले या कार्यक्रमाला मान्यवरांमध्ये प्रामुख्याने अनिलजी तिडके, सुधीरजी फटिंग, अक्षय तिडके, राजेश पालांदुरकर, सचिन दहीकर, माधुरीताई घोसेकर, प्रमोद पलांदुरकर, रमेश लांजेवार, मुकेश बारापात्रे, विनोद लांजेवार, भुषण दडवे,काशिनाथ ठवरे, विरेश दुरूगकर, प्रकाश भांडारकर, निखिल हरडे,राहुल शेंडे, राकेश शिरपुरकर, प्रदिप होरे,पारस मोरघरे, मंगेश खाणोरकर, दर्शन शनिवारे, अक्षय खाणोरकर,महेश तिडके, स्वप्निल रहाटे, हरीश माटे, मोहन मासुरकर, नितिन दहीकर, रीषभ डवले,हरिष मुरकुटे, अनुप हरडे,प्रलोक मोटघरे, हर्षल कावळे, राकेश शिरपुरकर, श्वेतांग खोब्रागडे,दिप दहीकर,कुणाल घोसेकर, स्वप्निल रनदिवे,सौरभ समर्थ,अनुप हरडे,बंडुजी शनिवारे, श्री डांगे,प्रणय दहीकर, अनिकेत,गौरव,पियुष, ईशान, वैभव, नवीन, हिमांशू, दर्शन,जय, अखिलेश, विवेक, सूचित, मायूली, प्रलोक,अलोक,मंदार इत्यादीसह युथ फाऊंडेशनचे संपूर्ण पदाधिकारी,आपुलकी परिवारचे पदाधिकारी व जेष्ठ नागरिक मंडळचे पदाधिकाऱ्यांसह मोठ्या प्रमाणात समाजबांधव प्रामुख्याने उपस्थित होते.

